# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट ३०८ - २३** **दिनांक : - ११/०९/२०२३**

## घरफोडी चोरी करणाऱ्या तीन सराईत आरोपींना अटक करुन चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत - नालासोपारा पोलीस ठाणेची कामगिरी.

दिनांक ०९/०७/२०२३ रोजी फिर्यादी रफीकुल रझबअली गाझी वय ३५ वर्षे रा. नालासोपारा पश्चिम यांनी नालासोपारा पोलीस ठाण्यात येऊन तक्रार दिली की, दिनांक ०४/०९/२०२३ रोजी १८.०० वा.पासुन ते दिनांक ०५/०९/२०२३ रोजी १३.४५ वा.चे दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरटयाने त्यांचे काका श्री शहरब गाझी यांचे घराची कडी कशानेतरी कापून दरवाजा उघडुन घरात प्रवेश करुन घरातील एकूण १६,९००/- रुपयांचा ऐवज घरफोडी चोरी करुन चोरुन नेला आहे सदरबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ४२५/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा तपास सुरु केला. नमुद अनोळखी आरोपीबांबत काहीएक माहिती नसताना प्राप्त पुरावे व तांत्रिक माहितीच्या आधारे गुन्हयाचा तपास करुन गुन्हयातील आरोपी नामे १) जुनेद अब्दुलकैस खान, वय २८ वर्षे, रा. नालासोपारा पश्चिम, ता.वसई, जि.पालघर २) मोहम्मद यासीन पप्पु शेख, वय २६ वर्षे, रा. नालासोपारा पश्चिम यांना दिनांक ०५/०९/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे. अटक आरोपींकडे अधिक तपास केला असता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपीकडून गुन्हयातील गेलेला सर्व ऐवज हस्तगत करण्यात आला आहे. तसेच नमुद आरोपीतांकडे आजुन चौकशी केली असता त्यांनी नालासोपारा पोलीस ठाणे कार्यक्षेत्रामध्ये यापुर्वी केलेल्या गु.र.क्र. I १२५/२०२३, भा.दं.वि.सं.कलम ३७९, ३४ हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले असुन नमुद आरोपीतांकडुन नमुद गुन्हयातील मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

| अनु.क्र | गुन्हा रजिस्टर क्रमांक व कलम |
|---|---|
| ०१ | गुन्हा रजि. नं. I ४२५/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ४५४,४५७,३८० अन्वये |
| ०२ | गुन्हा रजि. नं. I १२५/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३७९, ३४ अन्वये |

त्याचप्रमाणे नालासोपारा पोलीस ठाणे गु.र.क्र. १७९/२०२३ भा.द.वि. कलम ४५४, ४५७,३८० मधील आरोपी नामे बाबु देवा सादरा वय-१९ वर्षे रा. टाकीपाडा, नालासोपारा पश्चिम ता. वसई यास दिनांक ०५/०९/२०२३ रोजी अटक करण्यात आली असून त्याचेकडून गुन्हयातील गेला माल हस्तगत करण्यात आला आहे. नमुद आरोपीताकडे अधिक चौकशी केली असता त्याने खालीलप्रमाणे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे.

| अनु.क्र | गुन्हा रजिस्टर क्रमांक व कलम |
|---|---|
| ०१ | गुन्हा रजि. नं. I १७९/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ४५७, ३८० अन्वये |
| ०२ | गुन्हा रजि. नं. I ४३/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ४५७, ३८०,५११ अन्वये |
| ०३ | गुन्हा रजि. नं. I ३४/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ४५७, ३८० अन्वये |
| ०४ | गुन्हा रजि. नं. I १६/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ४५७, ३८० अन्वये |

| | |
|---|---|
| ०५ | गुन्हा रजि. नं. I ५४५/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३८० अन्वये |
| ०६ | गुन्हा रजि. नं. I ४५०/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३७९ अन्वये |

सदरची कामगिरी श्री. मधुकर पांडे, पोलीस आयुक्त, श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त, सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०३, राजेंद्र मोकाशी, सहा. पो.आयुक्त नालासोपारा, विजयसिंह बागल, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, सचिन कोतमिरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि. पंडीत मस्के, पोहवा. किशोर धनु, पोहवा. हिरालाल निकुंभ, पोहवा. प्रशांत साळुंके, पोना. अमोल तटकरे, पोशि. राजेश नाटुलकर, कल्याण बाचकर, प्रेम घोडेराव, यांनी केलेली आहे.

------------ooooooo---------------

